# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/ २१८ /२०१४

दि. २९ ऑक्टों.२०१४

प्रति
मा.प्राचार्य/ कार्यक्रम समन्वयक
रासयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय: 'दक्षता जनजागृती' आठवडा साजरा करणेबाबत...

महोदय,

राज्यात दरवर्षी दक्षता जनजागृती सपताह आयोजित करण्याचा निर्णय संदर्भाधीन दि. २२ ऑक्टों बर २००१ च्या शासन आदेशान्वये घेण्यात आलेला आहे.

या वर्षी दिनांक २७ ऑक्टोंबर २०१४ ते दि. १ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत मा. सहायक कार्यक्रम सल्लागार, रासेयो क्षेत्रीय कार्यालय, भारत सरकार यांनी पाठविलेल्या पत्रानुसार **'दक्षता जनजागृती सप्ताह'** च्या निमित्ताने जनतेमध्ये भ्रष्टाचाराबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यक्रमांचे आयोजन आपल्या महाविद्यालयात करण्यात यावे

१) आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील विद्यार्थी, प्राध्यापक व सेवक यांना सोबत जोडलेल्या शपथपत्राच्या नमुन्यानुसार **'दक्षता जागृती'** शपथ देण्यात यावी. (शपथेचा नमुना सोबत जोडला आहे)

२) आपल्या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या वतीने **'दक्षता जनजागृती'** विषयावर आधारीत भित्तीपत्रक पोस्टर्स, बॅनर्स तयार करून भ्रष्टाचार निर्मुलन जनजागृतीच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या प्रथमदर्शनी भागात लावण्यात यावे ही विनंती.

३) दक्षता जनजागृती सप्ताहामध्ये महाविद्यालयात भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामावर प्रकाश टाकण्यासाठी चर्चासत्रे, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्याने, कार्यशाळेंचे आयोजन करण्यात यावे.

४) आपल्या परिसरातील अशासकीय संघटना, स्वयंसेवी संस्था, सामान्य नागरिक यांना दक्षता जनजागृती सप्ताहामध्ये सहभागी होण्याकरीता आवाहन करण्यात यावे.

५) महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर **''भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या सेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभागाशी संपर्क साधावा.''** अशी सूचना व लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या स्थानिक कार्यालयाचा पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक लिहीलेला कायमस्वरूपी फलक लावण्यात यावा.

सदर उपक्रम आपल्या महाविद्यालयामध्ये यशस्वी व प्रभावीपणे राबवून या उपक्रमांचा सविस्तर अहवाल व छायाचित्रे nssrcpune@gmail.com आणि atulsalunke2007@gmail.com, nss@unipune.ac.in या मेल आय—डी वर व रासेयो कार्यालय यांना दि. २० नोव्हेंबर २०१४ पर्यत पोस्टाद्वारे पाठवावे, ही विनंती. **कळावे, धन्यवाद!**

आपला विश्वासू

प्र.कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

# दक्षता जनजागृती शपथ

आम्ही भारताचे लोकसेवक, याद्वारे गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की, आम्ही आमच्या सर्व कार्यक्षेत्रात सचोटी व पारदर्शकता आणण्याचा सातत्याने आटोकाट प्रयत्न करु, आम्ही सर्वतोपरी कार्य करु. आम्ही दक्ष राहून आमच्या संघटनेच्या वृद्धीसाठी व लौकीकासाठी कार्य करु. आमच्या सामुदायिक प्रयत्नांनी आम्ही आमच्या संघटनांना अभिमान प्राप्त करुन देऊ आणि आमच्या देशबांधवांना मूल्याधिष्टीत सेवा पूरवू. आम्ही आमचे कर्तव्य निष्ठापूर्वक पार पाडू आणि भय किंवा पक्षपात याविना कार्य करू.